# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**प्रेस नोट**

**दिनांक ०३/०८/२०२२ (बुधवार)**

**(सकाळ)**

---

## खून करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन जन्मठेपेची शिक्षा

**पो.स्टे. मौदा** :– दिनांक ०३/०६/२०१७ चे ००.५८ वा. दरम्यान फिर्यादी नामे– संतोष विष्णु मिसाळ, वय ४५ वर्ष, रा. रामनगर मौदा यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे अप. क्र. २६६/२०१७ कलम ३०७, ३०२ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ०२/०६/२०१७ चे २३.३० वा. दरम्यान आरोपी नामे– अविनाश अनिल पाटील, वय २३ वर्ष, रा. रामनगर मौदा हा आपल्या घरासमोर शिवीगाळ करीत असतांना त्याला मृतक नामे– रमेश ज्ञानेश्वर सतीकोसरे, वय २८ वर्ष, रा. मौदा याने आरोपीला शिवीगाळ का देतो? असे म्हणुन हटकले असता आरोपीने संतापुन आपल्या घरातुन चाकु आणुन त्याच्या मानेवर, छातीवर, पोटावर व मांडीवर वार करून जिव घेण्याच्या उद्देशाने मारून गंभीर जखमी केल्याने त्याचा जिव घेण्याचा प्रयत्न केले. त्याला उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल, नागपुर येथे भर्ती केले असता जखमी रमेश हा उपचारा दरम्यान मरण पावला. आरोपीला दिनांक ०३/०६/२०१७ चे ०१.३० वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री. भिमराव टेळे पो.स्टे. मौदा यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक ०३/०८/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. घुगे, अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३०७, ३०२ भादंवि. मध्ये जन्मठेप करावास व ५,०००/–रु. दंड व दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती परसोडकर यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनि श्रीमती शुभांगी वाझे तर कर्मचारी सहा.फौज. श्री. सुनिल डोंगरे, पोलीस हवालदार श्री. मनोज तिवारी, पोलीस नाईक श्री. प्रकाश वर्मा, पोलीस शिपाई श्री. विकास वाटकर यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**